# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ३ रे अंक २७६ वा गुरूवार दि.११ एप्रिल २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे, आ. कराड यांनी रेणापूरच्या रेणुकादेवीचे गुडीपाडव्यादिवशी घेतले दर्शन

लातूर :- लातूर लोकसभा निवडणुकीतील भाजपा व मित्र पक्ष महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांनी गुढीपाडव्याच्या शुभदिनी रेणापूर येथील असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या आदिशक्ती श्री रेणुका मातेची महापूजा करून आरती केली व आशीर्वाद घेतले यावेळी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.


देशाचे यशस्वी पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी आणि भाजपाच्या नेतृत्वाने लातूर लोकसभा मतदार संघातून विद्यमान खासदार श्री. सुधाकर शृंगारे यांना उमेदवारी दिली आहे. साडेतीन मुहूर्तापैकी एक असलेल्या गुढीपाडवा मंगळवार रोजी मतदार संघातील विविध ठिकाणच्या जागृत देवस्थानांना भेटी दिल्या. या दौऱ्यात असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या रेणापूर येथील आदिशक्ती श्री रेणुका मातेच्या मंदिरात विधिवत पूजा करून खा. सुधाकर शृंगारे यांनी आरती केली व आशीर्वाद घेतले. यावेळी भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांची प्रमुख उपस्थिती होती दरम्यान खा. शृंगारे आणि आ. कराड यांचे रेणापूर शहर भाजपाच्या वतीने फटाके फोडून वाजंत्री वाजवून जंगी स्वागत करण्यात आले.



यावेळी भाजपा सुपर वॉरियर्स मराठवाडा प्रमुख अनिल काळे, किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, लोकसभा निवडणूक प्रमुख राहुल केंद्रे, ओबीसी मोर्चाचे प्रदेश सचिव भागवत सोट, युवा मोर्चाचे प्रदेश सचिव ऋषिकेशदादा कराड, भाजपा पंचायत राज व ग्रामविकास सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, लोकसभा विस्तारक सिद्धेश्वर पवार, जिल्हा सरचिटणीस महेंद्र गोडभरले, शिवसेनेचे कुलदीप सूर्यवंशी, लातूर ग्रामीण विधानसभा अध्यक्ष अनिल भिसे, तालुकाध्यक्ष दशरथ सरवदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे विनोद आंबेकर, सांगायो समितीचे अध्यक्ष वसंत करमुडे, रेणापूरचे पहिले नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, अमर चव्हाण, चंद्रकांत कातळे, रमाकांत फुलारी, सुकेश भंडारे, शिवमुर्ती उरगुंडे, गणेश तूरूप, अच्युत कातळे, विजय चव्हाण, संतोष राठोड ,श्रीकृष्ण मोठेगावकर, दत्ता सरवदे, उज्वल कांबळे, भागवत गीते, श्रीकृष्ण पवार, दिलीप चव्हाण, मारुती गालफाडे, हेमंत दरेकर, शरद राऊतराव, श्रीमंत नागरगोजे, शंकर शिंदे, राजकुमार आलापुरे, धम्मानंद घोडके, संतोष चव्हाण, मनोज चक्रे, उत्तम चव्हाण, लखन आवळे, अंतराम चव्हाण, शेख अजीम, सुरेश बुड्डे, अर्चना जाधव, राधिका पाटील, शिला आचार्य, अनुसया फड, आशाताई भिसे, कल्पना गुडे, शितल भिसे, गणेश माळेगावकर, नरसिंग येलगटे, किशन कुडके, दिलीप आकनगिरे, राजू अत्तार, सचिन शिरसकर, नंदकिशोर बंडे, लक्ष्मण खलंग्रे, दिलीप पाटील, रोहित खुमसे, श्याम चक्रे, ओम चव्हाण, सोहेल बागवान, अमर मारलापल्ले, सुभाष राठोड, बळीराम मुंडे, प्रताप भाबरे, श्रीराम पांचाळ यांच्यासह भारतीय जनता पार्टी, राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा पवार गट, शिवसेना एकनाथ शिंदे गट, रिपाई आठवले गट, रासप व इतर महायुतीतील घटक पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कार-दुचाकी अपघातात दोघे जागीच ठार

उदगीर : प्रतिनिधी उदगीर तालुक्यातील लोहारा येथे दुचाकी व कारचा भीषण अपघात होऊन यात दोन जण जागीच ठार झाल्याची घटना १० एप्रिल रोज बुधवारी दुपारी १ वाजेच्या दरम्यान घडली आहे. लग्नपत्रिका वाटप करण्यासाठी जात असताना हा अपघात घडला. विशाल भिवा निलेवाड निलेवाड वय २२ वर्ष व आकाश धोंडिबा निलेवाड वय २३ वर्ष दोघेही राहणार अनुपवाडी (ता.उदगीर) हे लग्नपत्रिका देण्यासाठी त्यांची दुचाकी क्रमांक एम.एच.२४ बीक्यू ५८५३ वरून उदगीर येथून करडखेल येथे जात असताना लातूरहून उदगीरकडे येणारी एम.एच.१२ एनई ९१६३ या क्रमांकाच्या कार चालकाने दुचाकीला लोहारा दूध डेअरीजवळ उदगीर लातूर रोडवर समोरून जोराची धडक दिली, यात विशाल भिवा निलेवाड,आकाश धोंडिबा निलेवाड हे दोघे युवक जागीच ठार झाले. या घटनेची माहिती उदगीर ग्रामीण पोलिसांना मिळताच पोलीस उपनिरीक्षक देवकत्ते, पोलीस हेडकॉन्स्टेबल पडिले, नागरगोजे, पोलीस नाईक नाना शिंदे यांनी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले.



रोटी कपडा बँक सेवाभावी संस्थेच्या पदाधिका-यांना संपर्क साधला. त्या ठिकाणी रोटी कपडा बँकेचे शेख गौस, शेख समीर, खुर्शिद आलम, शेख जमील यांनी रुग्णवाहिकेसह घटनास्थळी धाव घेतली व दोन्ही युवकांचे मृतदेह रुग्णवाहिकेतून उदगीर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले, डॉक्टरांनी दोघा युवकांची तपासणी करून मृत घोषित केले. मयत विशाल भिवा निलेवाड यांचा १८ एप्रिल रोजी लग्न होते, लग्नाच्या अगोदर त्याच्यावर काळाने घाला घातला, या घटनेमुळे उदगीर तालुक्यात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. अपघात ठार झालेले दोघेही सख्खे चुलतभाऊ होते.

## खा. शृंगारेना रेणापूर तालुक्यातून मताधिक्य मिळावे हिच प्रत्येक कार्यकर्त्याची जबाबदारी

लातूर :- भ्रष्ट केलेल्या कारभारातून जेलची हवा मिळू नये यासाठी विरोधी पक्षाकडून केवळ मोदी हटाव हा एकच कार्यक्रम राबवला जात आहे. मुठभर लोकांना मोदी नको आहेत मात्र देशातील सव्वाशे कोटी जनतेला हवे आहेत तेव्हा मोदीजींना समर्थन देण्यासाठी महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांना रेणापूर तालुक्यातील मोठे मताधिक्य मिळावे यासाठी प्रत्येक कार्यकर्त्यांनी जबाबदारीने काम करावे असे आव्हान भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केले.




लातूर लोकसभा मतदारसंघातील भाजपा व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे आणि भाजप नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी गुढीपाडव्याच्या शुभ दिनी रेणापूर येथील असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या आदिशक्ती श्री रेणुका मातेची महापूजा करून आरती केली व आशीर्वाद घेतले त्यानंतर रेणापूर शहर आणि तालुक्यातील कार्यकर्त्यांशी संवाद साधताना आ. कराड यांनी आव्हान केले.

याप्रसंगी भाजपा सुपर वॉरियर्स मराठवाडा प्रमुख अनिल काळे, किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, लोकसभा निवडणूक प्रमुख राहुल केंद्रे, ओबीसी मोर्चाचे प्रदेश सचिव भागवत सोट, युवा मोर्चाचे प्रदेश सचिव ऋषिकेशदादा कराड, पंचायत राज व ग्रामविकास भाजपा सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, जिल्हा सरचिटणीस महेंद्र गोडभरले, विधानसभा अध्यक्ष अनिल भिसे तालुकाध्यक्ष दशरथ सरवदे शिवसेनेचे कुलदीप सूर्यवंशी राष्ट्रवादी काँग्रेसचे विनोद आंबेकर रेणापूरचे प्रथम नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे सांगायोचे अध्यक्ष वसंत करमोडे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

आपले दैवत लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब प्रचाराचा शुभारंभ रेनापुरच्या रेणुका देवीचा आशीर्वाद घेऊन करत होते. आज सुधाकर शृंगारे यांनीही रेणुका मातेचा आशीर्वाद घेऊन प्रचाराला सुरुवात केली असल्याचे सांगून यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की जगाचे नेतृत्व करण्याची क्षमता असणारे नरेंद्रजी मोदी यांच्या रूपाने आपल्याला नेतृत्व मिळाले हे आपले भाग्य असून त्यांनी गेल्या दहा वर्षात असंख्य लोक कल्याणकारी योजना सुरू करून त्याचा लाभ गोरगरीब सर्वसामान्य जनतेला दिला आहे. अनेक ऐतिहासिक निर्णय घेऊन सर्वांगीण विकासाची उंची गाठली आहे.

केंद्र आणि राज्य शासनाच्या माध्यमातून रेणापूर शहरात आणि तालुक्यातील गावागावात विविध योजनेच्या माध्यमातून कोट्यावधी रुपयाचा निधी उपलब्ध करून दिला आहे विकासाची कामे करत असताना आणि विविध योजनेचा लाभ देत असताना भाजपाने कधीच भेदभाव केला नाही तेव्हा भाजपा महायुतीच्या कार्यकर्त्यांनी दिलेली जबाबदारी शंभर टक्के पार पाडावी आपसातील हेवे-देवे बाजूला सारून प्रत्येक बुथवर भाजपाला मताधिक्य कशा पद्धतीने मिळेल यासाठी काम करावे असेही आव्हान भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केले.

गेल्या पाच वर्षातील केलेल्या कामाचा आढावा पाहून भाजपा पक्षश्रेष्ठीने पुन्हा मला संसदेत काम करण्यासाठी उमेदवारी दिली आहे त्याबद्दल सर्वांचे ऋण व्यक्त करून मला भाषण करता येत नाही मात्र कामे करायला आवडतात असे सांगून खा. सुधाकर शृंगारे म्हणाले की, मिळालेल्या संधीचं निश्चितपणे सोनं करून दाखवीन. गेल्या पाच वर्षात दोन वर्षाचा कार्यकाळ गेला असला तरी संपूर्ण मतदार संघात हजारो कोटींची विकास कामे झाली असल्याचे सांगून मोदी सरकारने केलेल्या विविध विकास कामाची सविस्तर माहिती दिली.

प्रारंभी ॲड. दशरथ सरवदे यांनी प्रास्ताविक केले, बैठकीचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले तर शेवटी अभिषेक आकनगिरे यांनी उपस्थित यांचे आभार मानले. या बैठकीस रेणापूर शहर आणि तालुक्यातील भाजपा राष्ट्रवादी काँग्रेस शिवसेना रिपाई व मित्र पक्षाचे पदाधिकारी लोकप्रतिनिधी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पतंजलीच्या बाबा रामदेव - बाळकृष्ण यांच्यावर होणार कारवाई

नवी दिल्ली : पतंजलीच्या वादग्रस्त जाहिरात प्रकरणात बाबा रामदेव आणि बाळकृष्ण यांना मोठा धक्का बसला आहे. सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी या दोघांचा दुसरा माफीनामाही फेटाळला आहे. न्यायमूर्ती हिमा कोहली आणि न्यायमूर्ती अमानतुल्ला यांच्या खंडपीठाने पतंजलीचे वकील विपिन सांघी आणि मुकुल रोहतगी यांना सांगितले की, तुम्ही न्यायालयाच्या आदेशाचे जाणूनबुजून उल्लंघन केले आहे, त्यामुळे तुम्हाला माफी नाही मिळणार , तुम्ही कारवाईसाठी तयार राहा, असे न्यायालयाने म्हटले.यापूर्वी २ एप्रिल रोजी याच खंडपीठात झालेल्या सुनावणीदरम्यान पतंजलीच्या वतीने माफीनामा सादर करण्यात आला होता. त्या दिवशीही खंडपीठाने पतंजलीला फटकारले होते आणि ही माफी केवळ दिखावा आहे, असे म्हटले होते. यानंतर न्यायालयाने १० एप्रिल रोजी प्रकरणाची सुनावणी करण्याचे सांगितले होते. ९ एप्रिल रोजी, सुनावणीच्या एक दिवस आधी, बाबा रामदेव आणि पतंजली आयुर्वेदचे व्यवस्थापकीय संचालक आचार्य बाळकृष्ण यांनी नवीन प्रतिज्ञापत्र दाखल केले. ज्यामध्ये पतंजलीने बिनशर्त माफी मागितली आणि या चुकीबद्दल खेद व्यक्त केला आणि असे पुन्हा होणार नाही अशी गाव्ही दिली होती, मात्र, न्यायालयाने हा माफीनामाही फेटाळून लावला आणि बाबा रामदेव आणि बाळकृष्ण यांना कारवाईसाठी तयार राहण्यास सांगितले. या प्रकरणाची पुढील सुनावणी १६ एप्रिल रोजी होणार आहे.आयएमएने पतंजलीविरोधात दाखल केली याचिका दरम्यान, इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) ने पतंजली विरोधात ही याचिका १७ ऑगस्ट २०२२ रोजी दाखल केली होती. या याचिकेवर सध्या सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. पतंजलीने कोविड लसीकरण आणि ॲलोपॅथी विरोधात नकारात्मक प्रचार केला. यासोबतच पतंजलीच्या आयुर्वेदिक औषधांनी अनेक रोग बरे केल्याचा खोटा दावा केला होता, असा आराप आयएमएने या याचिकेव्दारे पतंजलीवर केला आहे.

## महाविजय २०२४. गुढी विकासाची.. गुढी सौख्याची.. गुढी विजयाची !







लातूर - लातूर लोकसभा मतदारसंघातील महाविजय २०२४ अंतर्गत श्री. सुधाकर शृंगारे यांनी उदयगिरी महाराज मठ तसेच दुधिया हनुमान मंदिर, उदगीर, देवर्जन (हत्ती बेट), श्री स्वामी समर्थ मठ, निलंगा, ग्रामदैवत वटसिद्ध देवस्थान वडवळ नागनाथ, रेणापूरचे ग्रामदैवत माता रेणुकादेवीचे मनोभावे दर्शन घेतले. मतदारसंघातील जनतेच्या उत्कर्षाची कामना केली व उपस्थित भाविक-भक्तांशी संवाद साधला. तसेच उदगीर येथील सुमंगल मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलच्या उद्घाटन समारंभास उपस्थित राहून उत्तम रुग्णसेवेसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी मंत्री आणि आमदार श्री. संभाजीभैया पाटील निलंगेकर, आमदार श्री. रमेशअप्पा कराड, जिल्हाध्यक्ष ग्रामीण श्री. दिलीपराव देशमुख, भाजपा प्रदेश प्रवक्ते श्री. गणेश दादा हाके, प्रदेश प्रवक्ते श्री. शिवानंद हैबतपुरे, माजी आमदार श्री. गोविंदअण्णा केंद्रे, लोकसभा निवडणूक प्रमुख श्री. राहुल केंद्रे, भाजप जिल्हा सरचिटणीस श्री. भारत चामे, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष श्री. बालाजी पाटील चाकूरकर, भाजप ग्रामीण महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष श्रीमती उत्तराताई कलबुर्गे, भाजप ग्रामीण युवा मोर्चा अध्यक्ष श्री. अमोल निडवदे, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष श्री. रामभाऊ तिरुके, माजी जि. प. सभापती श्री. बापूराव राठोड, माजी जिल्हा परिषद सभापती श्री. रोहिदास वाघमारे, किसान मोर्चाचे श्री. विक्रम शिंदे, युवा नेते श्री. ऋषिकेशभैय्या कराड, उदगीर तालुका भाजपा अध्यक्ष श्री. शिवशंकर धूप्पे, अध्यक्ष भाजपा निलंगा श्री. कुमुद लोभे, शहराध्यक्ष निलंगा भाजपा श्री. बाबासाहेब शिंगोडे, चाकूर तालुका भाजपा अध्यक्ष श्री. वसंतराव डिगोळे, रेणापूर तालुका भाजपा अध्यक्ष श्री. दशरथ सरवदे, उपाध्यक्ष नगर परिषद उदगीर श्री. सुधीर भोसले, श्री. बसवराज रोडगे, नगरसेवक श्री. आनंद बुंदे, श्री. डॉ.विजयजी बिराजदार, डॉ. राधिका बिराजदार, श्री. सुभाषजी बिराजदार, श्री. सुमितजी करमले, मा. न्यायाधीश अश्विनीताई करमले श्री. प्रसाद नाईकवाडे, श्री.श्रावण पस्तापुरे, श्री. रामेश्वर पवार, श्री. साधू लोणीकर, श्री. गणेश गायकवाड, श्री. अमोल अंकल्ले, श्री. दत्ता पाटील, श्री. प्रसाद नाईकवाडे, श्री. चैतन्य बोईनवाड, श्री. शुभम सुपारी, श्री. रामेश्वर चांडेश्वर, श्री. मयूर पटणे, श्री. शंकर रोडगे, श्री. कपिल मादळे, नगरसेवक श्री. उपेंद्र चव्हाण, शिल्पाताई इंगळे, उषाताई माने, श्री. बसवराज रोडगे, श्रीमती उषाताई रोडगे, श्री. सुधाकर बिराजदार, पत्रकार मित्र श्री. व्ही. एस. कुलकर्णी, श्री. शंकर रोडगे, . रोहिदास वाघमारे, श्री. अशोकदादा चिंते, श्री. रणजीत मिरकले, विस्तारक श्री. सिद्धेश्वर पवार, श्री. सुरेश हाके, श्री. रमेश पाटील, , श्री. नवनाथ भोसले, श्री. अभिषेक अकनगिरे, श्री. भागवत सोट, विस्तारक श्री. सिद्धेश्वर पवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजितदादा गट) श्री. विनोद आंबेकर, शिवसेनेचे (शिंदे गट) श्री. कुलदीप सूर्यवंशी, भाजप महिला तालुका अध्यक्षा अनुसूयाताई फड आदी मान्यवर पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

## संपादकीय....

# शेतीची विकासनीती

राजकारण हे व्यवस्थेत बदल घडवण्यासाठी असते. समाजात आजूबाजूच्या परिस्थितीत आर्थिक, सामाजिक आणि राजकीय परिवर्तन आणणे, हे कोणत्याही राजकीय पक्षाचे अथवा नेत्याचे मूलभूत कामच असते. प्रत्येक कार्यकर्ता, नेता अथवा मंत्री, मुख्यमंत्री व पंतप्रधान आपापल्या कक्षेत किंवा चौकटीत हे काम करत असतात. ज्यांचे काम समाधानकारक नसते, ते निवडणुकीत पराभूत होतात. सर्वसामान्य माणसाच्या व्यवस्थेकडून अपेक्षा प्राप्त परिस्थितीतून स्वत:च्या आर्थिक उन्नतीकडे जाण्याच्या वा नेल्या जाण्याच्या असतात. जे कष्ट व दुःख सोसले, ते यापुढे तरी सोसावे लागू नये, सुखाचे दिवस दिसावेत, असे त्यांना वाटत असते.किमान डोक्यावर छप्पर, पोटभर अन्न आणि हाताला काम या त्यांच्या प्राथमिक अपेक्षा असतात; परंतु २१ व्या शतकात यापलीकडेही आकांक्षा असणे, हे स्वाभाविक आहे. म्हणजे केवळ घर म्हणजे डोक्यावरचे छत नव्हे, तर घर, टर्नर-फिटरचीच नोकरी नाही, तर उच्च प्रतीची नोकरी, तसेच पोषक आहार आणि पर्यटन, प्रवास करता येईल, आरोग्य ठेवताना आवश्यक ते उपचार घेता येतील इतपत उत्पन्न मिळाले पाहिजे, असे आज प्रत्येकाला वाटणे साहजिक आहे. जनतेच्या केवळ ऐहिक गरजा नसतात, तर आध्यात्मिक व धार्मिकही असतात. त्यासाठी तीर्थक्षेत्रांचा विकास, मंदिर परिसराचे नूतनीकरण ही कामे हाती घ्यावी लागतात. मुळात वर्षानुवर्षे भारतातील राज्यकर्त्यांनी रोटी-कपडा-मकान या चौकटीतूनच जगाकडे पाहिले. स्वातंत्र्यानंतरच्या कालखंडात त्या गरजा पूर्ण करण्यास प्राधान्य देण्याशिवाय पर्याय नव्हता.गेल्या दहा वर्षांत जगाकडे पाहण्याची दृष्टी बदलायला हवी, जागतिकीकरणात टिकायला हवे आणि त्याचबरोबर आत्मनिर्भरही व्हायला हवे, ही नवी दृष्टी तयार करताना त्यासाठीचे धोरणही आखण्यात आले. त्यामुळे जागतिक राजकारणात भारताचे स्थान उंचावते आहे. आज जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था भारताची असून, येत्या पाच वर्षांत ती तिसर्या क्रमांकाची होईल, असे उद्दिष्ट बाळगले गेले आहे. २०४७ पर्यंत समृद्ध भारताचे स्वप्न साकारण्यासाठी कोणकोणते टप्पे गाठावे लागतील, याची संपूर्ण आखणी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केली गेली आहे. विकसित भारताचे स्वप्न हा सकारात्मक अजेंडा सरकारने हाती घेतला आहे. वास्तविक नवीन पिढीस उमेद देणारा, नव्या आशा-आकांक्षांना जन्म देणारा असा कार्यक्रम देणे विरोधकांनाही शक्य आहे. लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये या दृष्टीने जाहीरपणे चर्चा केल्यास सर्वसामान्य जनतेचे नक्कीच प्रबोधन होईल.आता विकसित भारतासाठी आणि जागतिक नव्या आव्हानांना सामोरे जाता यावे यासाठी शेतीचे आधुनिकीकरण करण्याची वेळ आली आहे. सहकार क्षेत्रात, विशेषतः कुक्कटपालन व दुग्धोत्पादन क्षेत्रात ग्रामीण भागातील शेतकरी आणि महिला मोठ्या संख्येत काम करतात. त्यामधून खेड्यापाड्यांचा आणि शेती अर्थव्यवस्थेचा चेहरामोहरा बदलू शकेल, असे प्रतिपादन पंतप्रधान मोदी यांनी केले आहे. गेल्या फेब्रुवारीतच पंतप्रधानांच्या हस्ते ११ राज्यांमध्ये सहकारी क्षेत्रातील सर्वात मोठ्या अशा अन्नधान्य साठवणूक योजनेच्या पथदर्शी प्रकल्पाचे उद्घाटन झाले. देशात पुढच्या टप्प्यात पाचशे ठिकाणी अशाच प्रकारे गोदामे व अन्य शेती सुविधा निर्माण केल्या जाणार आहेत.'सहकारातून समृद्धी' अशी घोषणा दिली गेली असून, सहकारासाठी स्वतंत्र मंत्रालय यापूर्वीच निर्माण करण्यात आले आहे. देशातील १८ हजार प्राथमिक शेती पतसंस्थांचे संगणकीकरण पूर्ण झाले आहे. आपल्या प्राचीन संस्कृतीत म्हटलेच आहे की, 'अल्पानाम् अपि वस्तुनाम् संहतिः कार्यसाधिका.' अर्थात, छोट्या गोष्टी किंवा साधने एकत्र आल्यास कोणतेही काम तडीला नेता येऊ शकते. देशामध्ये १० हजार फार्मर प्रोड्युसर ऑर्गनायझेसन्स (एफपीओ) स्थापन करण्याचे लक्ष्य सहकार मंत्रालयाने निश्चित केले आहे आणि त्यापैकी ८ हजार संस्थांचे कामही सुरू झाले आहे. गुजरातमध्ये 'अमूल'सारख्या सहकारी संस्थेने दुग्धक्रांतीतून त्या संपूर्ण राज्यात बदल घडवला. महाराष्ट्रात सहकार क्षेत्राने, विशेषत: दूध, सूत आणि साखर धंद्यात मोलाची कामगिरी करत ग्रामीण अर्थकारण तारले आहे.शेतीला सहकाराची आणि पूरक धंद्यांची जोड दिली, तर आमूलाग्र परिवर्तन कसे होते, ते यावरून दिसून आले आहे. १९९१-९२ ते २०२३-२४ या काळात भारताचा सरासरी आर्थिक विकासदर ६.१ टक्के होता, तर शेती क्षेत्राचा तो त्याच्या जवळपास निम्मा म्हणजे ३.३ टक्के होता. गेल्या १० वर्षांचाच विचार केला, तर एकूण विकासदर ५.९ टक्के असून, कृषी विकासाचा दर ३.६ टक्के इतका आहे. देशातील काम करणार्या लोकसंख्येपैकी ४५ टक्के लोक हे कृषी क्षेत्रात आहेत. विकसित भारत हा सर्वसमावेशक असावा, असे वाटत असेल, तर शेती क्षेत्राची क्षमता पूर्णपणे वापरात येणे आवश्यक आहे. त्यासाठी उत्पादकता वाढायला हवी आणि पाण्याचा वापर घटायला हवा. भूजलाचे पुनर्भरण झाले पाहिजे. एकीकडे शेती क्षेत्रातील काम करणार्यांची संख्या कमी झाली पाहिजे आणि अशा लोकांना नवी कौशल्ये शिकवून, उत्पादक रोजगार मिळवून देणे जरूरीचे आहे. म्हणूनच ग्रामीण भागात कौशल्य विकासाचा कार्यक्रम प्राधान्याने राबवायला हवा, अशी सूचना कृषितज्ज्ञ करत आहेत.अन्न व खताची अनुदाने घटवून त्यामधून जो निधी वाचेल, तो शेती संशोधन, कृषी विस्तार सेवा, शेतीतील नवे प्रयोग, पाणलोट क्षेत्र विकास यावर मोठ्या प्रमाणात खर्च करणे आवश्यक आहे. मुळात कुक्कुट, मत्स्य, दुग्धजन्य उत्पादने, फळे, भाज्या अशा जास्त लाभ मिळवून देणार्या शेतीकडे अधिक प्रमाणात वळले पाहिजे. तसेच शेती क्षेत्रात लागवडीपासून बाजारापर्यंत अशी एक मूल्य साखळी तयार करण्याची गरज आहे. डिजिटल कॉमर्स, कंत्राटी शेती हे प्रयोग अधिक प्रमाणात राबवायला हवेत.

# बुद्धिवान गुरु शिष्याची जयंती आणि निष्टावंत शिष्य अनुयायी.




आजच्या घडीला २०२४ ला देशात खूप बुद्धिवान आहेत,परंतु त्यांच्याजवळ निष्ठा नाही,असे लोक समाजाला विकण्याचे काम करतात.सामाजिक आंदोलनासाठी निष्ठेची खूप गरज आहे. निष्ठेशिवाय कोणतेही आंदोलन चालविणे किंवा ते यशस्वी करणे शक्य नाही.जर तुम्ही आंदोलन उभे करायचे ठरविले असेल तर निष्ठेची खूप गरज आहे. निष्ठेचा काय अर्थ आहे जे स्वप्न घेऊन तुम्ही पुढे चालत आहात त्या स्वप्नाला पूर्ण करण्यासाठी जे काम तुम्ही सुरु करता त्या कामाला आचार विचार करून स्वीकार केले पाहिजे. आणि जर विचार करून स्वीकार केले असेल तर जिंदगीभर ते पूर्ण करण्यासाठी ते निभवाल तर तुम्हाला निष्ठावान आहेत आणि आणि या कामाला पूर्ण करण्यासाठी तुम्ही जीवनभर कष्ट केले असे म्हणता येते.आर एस एस प्रणीत भाजपासह सर्व संस्था संघटना आज त्यांच्या २०२५ च्या शतकात प्रवेश करीत आहेत.

आंदोलन चालवण्यासाठी निष्ठेची आवश्यकता आहे.परंतु आंदोलन फक्त निष्ठेच्या विश्वासावर चालत नाही.बुद्धीची पण गरज असते.डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की मला निष्ठावान लोक पाहिजेत,बुद्धीची भरपाई मी करेन बुद्धीला बाबासाहेबांनी दुसऱ्या स्थानावर ठेवले. निष्ठा नाही आणि केवळ बुद्धी आहे तर खूप भयावह आहे. कारण जे बुद्धिवान आहेत त्यांच्याजवळ निष्ठा नाही, असे लोक समाजाला विकण्याचे काम करतील.आता २०२४ च्या लोकसभा निवडणूकीचे वातावरण आहे. बुद्धिवान गुरु शिष्याची जयंती आणि निष्टावंत शिष्य अनुयायाची परीक्षा आहे. १८५१ साली महार,मांग,चांभार आदी अस्पृश्य मानलेल्या बांधवांसाठी पहिले ज्ञान मंदिर उघडण्याचे ज्योतीबांनी जाहीर केले.गावभर बातमी पसरली.मोरशास्त्री चेकाटले,'ज्यांना शिवले तर अधर्म होतो,त्यांच्यासाठी शाळा..? नीच जातीतल्या लोकांना शिक्ष भ्रष्टाचार भ्रष्टाचार.. कोंडभट आश्चर्यचकित होऊन बोलू लागले.अहो,तो ज्योतिबा ख्रिस्ती होणार आणि शिकलेल्यानाही बाप्तिस्मा देणार याला गावाबाहेर हाकलले पाहिजे.धोंडभट आवाज चढवून म्हणाले.मुलींच्या शाळा काढल्या आणि नीतीची व धर्माची राख रांगोळी केली.पुढे बायका पुरुषांच्या डोक्यावर मिरी वाटतील.महारमांग शिकले तर उद्या रस्ते कोणी झाडणार नाहीत.मेलेल्या गुरांची मढी ओढणार नाहीत.मोर्या गटारे धुणार नाही.भंगी शिकले तर मैल्याच्या पाट्या डोक्यावर घेणार कोण? महार,मांग,भंगी शेफारतील.काहीतरी बंदोबस्त झालाच पाहिजे. आता तर महारमांगांची शाळा काढून फुल्याने कहर केला आहे.. नारभटाने पाढा वाचला... भिकंभटाने नारभटाची री ओढली. अहो,जरा युक्तीने निकालच लावा की याचा.. शाम भट तणतणून म्हणाले.चार चौघांचे टोळके जमले.खल झाला.काहीतरी कट शिजला.ज्योतीबांचे घर म्हणजे आनाथ मुलांचा आसरा.ज्यांना आईबाप नव्हते,मायेचे माणूस नव्हते,अशा टाकलेल्या,सोडलेल्या मुलांचे आईबाप सावित्री बाई आणि ज्योतिबा. अनेक मुलांचा सांभाळ ते करीत.मध्यरात्र उलटून गेली होती.सगळी मुले गाढ झोपली होती.मध्येच एक बाळ चुळबुळले,रडू लागले. त्याचा रडण्याचा आवाज ऐकून ज्योतीबांना जाग आली ते उठले. पाळण्याजवळ गेले.त्या मुलाला उचलून घेतले.त्याला थोपटून खांद्यावर निजवू लागले.त्या वेळी दोन मारेकरी दबकत दबकत येऊन दारा आड लपले होते.एकाचे नाव धोंडीराम आणि दुस-याचे रोडे.रामोशी जातीचे.त्यांच्या हातात पाजललेल्या फरशा होत्या. त्यांना ज्योतीबांना जीवे मारावयाचे होते.ते दारा आड उभे होते. इतक्यात वारा आला.दार उघडले जाऊन करकर आवाज झाला. ज्योतीबांनी दाराकडे पाहिले तेव्हा त्यांना मारेकर्यांची छाया भिंतीवर पडलेली दिसली.कोण..?.कोण आहात तुम्ही..? काय पाहिजे तुम्हाला..? ज्योतीबांनी विचारले.त्या बरोबर ते मारेकरी आत शिरले.धोंडीराम म्हणाला..आम्ही तुमचा खून करण्यासाठी आलो आहोत.ज्योतिबा म्हणाले...का बरे...? माझं काही चुकलं काय..?.मी कोणाचे नुकसान केले आहे काय..? पण उत्तर आले नाही. ज्योतीबांनी पुन्हा विचारले,बोला, घाबरू नका...कोणत्या कारणाने तुम्ही असे करण्याचा निर्णय घेतला...? रोडे म्हणाला... तुमचा खून केल्यावर एकेक हजार रुपये मिळणार आहेत आम्हाला... ठिक आहे.मला मारण्याने आपला फायदा होत असेल तर माझी मान मी आपल्या पुढे तुकवितो. पण माझी एक शेवटची नम्र विनंती आहे.मी गेल्यावर या अनाथ बालकांचे लालन पालन तुम्ही करा.त्यांना शाळेत घाला.त्यांना शिकवा.त्यांच्यावर प्रेम करा. दिव्याची वात मोठी करीत ज्योतिबा म्हणाले.वात पुढे सारताच त्या खोलीत लख्ख उजेड पडला.धोंडीराम व रोडे यांनी खोलीत निजलेल्या बालकांकडे पाहिले.अरे हा तर झख्या महाराचा पोरगा दिसतो.या पोराचा बाप मागल्या वर्षीच देवाच्या घरी गेला.आणि हा कोण..? हा तर शिद्या चांभाराचा गण्या झोपलाय लेकाचा.आणि हा बन्या.न-याभाऊंच्या रंडक्या पोरीचा पोरगा. त्यांनी सगळ्या बालकांकडे पाहिले. ती निष्पाप,निरागस वृत्तीची अनाथ बालके महार-मांगवाड्यातीलच होती.आपल्याच जातीतल्या,नात्यागोत्यातल्या अनाथ,चिमण्या बालकांचे लालन-पालन ज्योतिबा करीत आहेत हे त्यांना कळून चुकले.त्यांना त्या झोपडीत मूर्तिमंत वात्सल्याचे मंगल दर्शन झाले. त्यांचे मन द्रवले.अंत:करण गदगदलं.हातातील फरश्या नकळत खाली गळून पडल्या.धोंडीरामने एकदम ज्योतीबांच्या पायांना मिठी मारली आणि त्यांच्या पावलांवर आसवे ढाळीत तो सदगदित होऊन म्हणाला, तात्या साहेब क्षमा करा आम्हाला.अविचाराने आमच्याकडून मोठे पाप घडले असते आज.तुम्ही खरोखर देवमाणूस आहात.अनाथांचे नाथ आहात.. दुस-या मारेक-यानेही ज्योतीबांच्या पावलांवर लोटांगण घातले.ज्योतिबा थोर संतच.त्यांनी दोघांना जवळ घेतले.आलिंगन दिले.त्या दोघांच्या डोळ्यांतून गंगा यमुना वाहू लागल्या.त्यांचे मन साफ धुतले गेले. पवित्र झाले.पुढे दोघांनाही ज्योतीबांनी आपल्या रात्रीच्या प्रौढ शिक्षण शाळेत दाखल करून घेतले. शिकून ते मार्गाला लागले.पुढे रामोशी रोडे ज्योतीबांचा संरक्षक झाला. धोंडीरामाला त्यांनी शिक्षणासाठी काशीला पाठविले.धोंडिराम नामदेव कुंभार हा शिकून महापंडित बनला.त्याने 'वेदाचार' हा ग्रंथ लिहिला.सत्यशोधक समाजाचा तो आधारस्तंभ बनला.दृष्टांनी रचलेला खुनाचा डाव हुकला.त्यांची फजिती झाली. ज्योतीबांनी आपले काम सतत पुढे चालू ठेवले. संदर्भ:-महात्माज्योतिबाफुले.लेखक:-ग.द.माळी(पाननं.४५ते४८) २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत मनुवादी मानसिकता मोदी विरोधात गांधीवादी मानसिकता असलेले हरिजन वंचित बहुजन समाजाला स्वाभिमानी ओळख निर्माण करण्यास मनाई करीत आहेत.त्यात बुद्धिवान गुरु शिष्याची जयंती आणि निष्टावंत शिष्य अनुयायी यांची मानसिकता दिसून येत आहे



*******

**सागर रामभाऊ तायडे**
**९९२०४०३८५९,**
**भांडुप,मुंबई.**

# संघर्षातून सिद्धीकडे

जीवन जगत असताना आपण पाहतो,कधी अस वाटत आता सर्व मार्ग बंद झालेत आणि आपण हताश होतो व नकारात्मक भूमिका मनावर हावी होऊन पुढे पाहणच बंद करतो.अनेकांनी ह्या स्थितीचा अनुभव जीवनात एकदा तरी घेतला असेलच.जीवन हे संघर्षाने उज्वल बनते हे काही नवीन नाही प्रत्येकजण जीवन जगण्यासाठी सर्व प्रकारे प्रयत्न करत राहतो ज्यामध्ये उपजीविका भागवण्यासाठी विविध प्रकारची कामे असतील कुणी नोकरी तर कुणी व्यवसाय प्रत्येक क्षेत्रात संघर्ष आहेच.शिक्षण,आकलनशक्ती,चातुर्य, समज आणि बुद्धिमत्ता जरूर सर्वांच्या वेगवेगळया असतील परंतु जगण्याची जिद्द सर्वांची सारखी असते व यासाठी मनुष्य अविरत प्रयत्न करत राहतो.पशू ,पक्षी आणि जीवजंतू हे सुद्धा जगतच असतात मग त्यांचा उदरनिर्वाह कोण चालवतो कारण ते तर माणसा सारखे काहीच काम,व्यवसाय करत नाहीत.ईश्वराने जन्म दिला आहे तेंव्हा त्याची काळजी सुद्धा तो करणारच.पृथ्वीतलावर केवळ मनुष्य धडपडत राहतो आणि जीवनाबद्दल कायम उदासीन सुद्धा राहतो.

आपण मोठ-मोठ्या व्यक्तीबद्दल अभ्यास केला तर एक गोष्ट प्रखरतेने लक्षात येईल की कुणाचेच जीवन हे सुखकर नव्हते सर्वांनी आकंठ संघर्षातून जीवन घडवले आहे.हलाखीच्या परिस्थितीत दिवस काढून त्यांनी ते साध्य करून दाखवलं जे इतर लोकांना अशक्य वाटत असे.अखंड स्वराज्याची स्थापना केवळ संकल्पना होती परंतु शिवकालीन इतिहास पाहिला तर बोटावर मोजण्या इतक्या मावळ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नेतृत्वात हीच संकल्पना साध्य करून दाखवली,विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणासाठी अहोरात्र मेहनत घेतली व त्या शिक्षणाच्या ताकतीने संविधान निर्मिती करून मोलाचे योगदान दिले.भारत सुध्दा एक दिवसात स्वतंत्र झाला नसून त्यात अनेक थोर लढवय्या स्वातंत्र्यसैनिकांचा प्रबळ इच्छाशक्तीचा वाटा आहे.नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे अदम्य साहस,लोकमान्य टिळकांची संघटन शक्ती,सावित्री बाई फुले यांनी महिलांसाठी शिकण्याची मुहूर्तमेढ रोवली तर भगतसिंग यांनी अगदी पोर वयात बलिदान दिले व हे सर्व करू शकले कारण त्यांनी नकारात्मक भावनेला जीवनात थारा दिला नाही.

एक एक धागा जोडून सुंदर वस्त्र निर्मिती होते.एक एक विट रचून इमारती बांधल्या जातात.पक्षी एक एक गवताची काडी जमा करून घरटे तयार करतात म्हणून कुठेतरी छोटीसी सुरुवात केल्यानंतरच मोठं मोठी ध्येय साध्य होऊ शकतात.एक छोटी ठिणगी संपूर्ण जंगल उध्वस्त करण्याचं सामर्थ्य ठेवते आणि हीच ठिणगी जर मनात एक जिद्द पेटवण्यासाठी पडली तर माणसासाठी काहीच अशक्त राहत नाही.झाडावर चढताना साधी मुंगी सुध्दा हजारदा पडते परंतु जिद्दीने पुन्हा एकदा प्रयत्न करतेच.माणसाने मधाची पोळी काढून घेतली म्हणून मधमाशी कधी मधसंचयाचे काम सोडत नाही मग जर हे करू शकतात तर माणूस बलशाली,बुद्धीशाली असून का खचून जातो.एक शारीरिक विकलांग भिक मागताना दिसतो तर कुठेतरी असाच एक विकलांग काम करताना पण आपण पाहतो मग विकलांगता ही शारीरिक अपंगत्वाचे कारण नसून मानसिक अपंगत्वाचे आहे हे सिद्ध होते.नकळतपणे फेकलेले बी रुजते तर खडकातून वर मान काढत सुंदर रोपटे जन्म घेऊ शकते कारण मनाची तयारी भक्कम असेल तर सुरुवात कुठूनही करता येते.

संघर्षमय जीवन जगासाठी उदाहरण बनून जाते.लढाई न करता हार मानन्यापेक्षा लढत मरणे कधीही उत्तम.

**********

पवन श्रीरंगसा कुसुंदल
नंदीग्राम सोसायटी,नांदेड
संपर्क: ९०७५५९५६९५

# राज्यात फक्त ३८ टक्के जलसाठा सोबत उष्णतेची लाट;तर दुसरीकडे पाण्याचा हाहाकार!!!

उन्हाचे चटके चोहोबाजूंनी जाणवू लागले असतानाच राज्यात लघु,मध्यम व मोठ्या प्रकल्पात केवळ ३८ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे.पाणी टंचाईच्या झळा जाणवू लागल्याने राज्यातील १ हजार २३३ गावात आणि २ हजार ७७५ वाड्यांवर टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे.यामुळे यावर्षी पाणीप्रश्न अत्यंत गंभीर होण्याचा धोका व्यक्त होत आहे.येत्या काळात उन्हाचा पारा वाढल्याने पाण्याची भिषण टंचाई निर्माण होवू शकते याला नाकारता येत नाही.कारण राज्यातील २ हजार ९९४ प्रकल्पांची एकुण क्षमता ४० हजार ४८५ दशलक्ष घनमीटर आहे.सध्या या प्रकल्पामध्ये फक्त १५ हजार १८९ दशलक्ष घनमीटर पाणी साठा उरला आहे. म्हणजेच दिवसेंदिवस पाण्याची समस्या आणखीनच बिकट होण्याची शक्यता दिसत आहे.सध्या राज्यातील १८ ते २० धरणे कोरडी पडली आहेत.त्यामुळे येत्या काळात तीव्र पाणीटंचाईला सामोरे जावे लागणार असल्याचे चिन्ह जवळपास निश्चित आहे.यावर्षी नेहमीपेक्षा कमी पाऊस झाल्याने उष्णतेच्या लाटे सोबतच पाण्याच्याही हाहाःकाराला आतापासूनच सुरूवात झाली आहे.दरवर्षी पावसाची कृपादृष्टी असणारा पश्चिम महाराष्ट्र यंदा पाण्यासाठी तडफतो आहे. त्यामुळे आतापासूनच टँकरग्रस्त झाला आहे.पुणे विभागातील कोल्हापूर जिल्हा वगळता पुणे, सातारा, सांगली, आणि सोलापूर या चार जिल्ह्यांतील विहिरींनी तळ गाठला आहे. यामुळे ३३४ गावातील ६ लाख ७२ हजार ८०७ नागरिकांना ३६४ टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे.यावरून स्पष्ट होते की संपूर्ण महाराष्ट्रात पाण्याची टंचाई भेडसावणार आहे. याचे प्रायचित्य मानव, पशुपक्षी, संपूर्ण जीवजंतू,जंगल संपदा यांना आतापासूनच भोगावे लागत आहे.अजुन पावसाळ्याला तीन महिने बाकी आहे. राज्यासह देशातील जलाशय साठा निम्म्यावर आलेला आहे तर दुसरीकडे सुर्य आग ओकत आहे म्हणजेच पाण्याची समस्या आणि सुर्याचे अक्राळविक्राळ रूप आणि जलसाठा कमी होने यामध्ये पृथ्वीतलावरील संपूर्ण जीवसृष्टीला यावर्षी अत्यंत कठीणायीचा सामना करावा लागण्याचे स्पष्ट चित्र दिसत आहे. महाराष्ट्रासह देशातील बदलत्या हवामानामुळे सर्वत्र उष्णतेची लाट तर कधी अवकाळी पाऊस व गारपीट यामुळे संपूर्ण जीवसृष्टी मानव, पशुपक्षी यांचे जीवन विस्कळीत होतांना दिसते तर दुसरीकडे वाढत्या तापमानामुळे पाण्याची समस्या दिवसेंदिवस अत्यंत बिकट होतांना दिसत आहे.विदर्भात नागपूर, यवतमाळ, अकोला, चंद्रपूर येथे उष्णतेची लाट कायम आहे तर मुंबईसह रायगड, ठाणे, पालघर येथे उकाडा वाढला आहे.म्हणजेच सुर्याने आपले उग्र रूप कळत न कळत सर्वत्र पसरविले आहे.त्यामुळे हवामान खात्याने महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांना उष्णतेच्या बाबतीत एलो अलर्ट घोषित केले आहे.५ तारखेला सोलापुरचे सर्वाधिक तापमान ४३.१ अंश सेल्सिअस, विदर्भातील सरासरी तापमान ४२ अंश सेल्सिअस, मध्य महाराष्ट्र व मराठवाड्यातील तापमान ४० अंश सेल्सिअसची नोंद झाली.यावरून स्पष्ट होते की दिवसा तर उकाडा वाढलाच परंतु रात्रीही उकाड्याचे चटके संपूर्ण महाराष्ट्राला सहन करावे लागत आहे.हवामान खात्याने असेही वर्तविले आहे की एप्रिल ते जून महिन्यात देशातील अनेक भागातील उन्हाची झळ अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. त्यामुळे येणारे तीन महिने सर्वांनीच आपापली काळजी घेणे गरजेचे आहे.राज्यातच नाही तर देशातील अनेक भागात सुर्य आग ओकतांना दिसतो आणि हा संपूर्ण प्रकार दिवसेंदिवस बदलत्या हवामानामुळे निर्माण झालेला आहे.यावर्षी वेळेच्या आधीच सुर्याने आक्राळ - विक्राळ रूप धारण केल्याचे दिसून येते आणि पुढे आणखी भयानक स्थिती निर्माण होवू शकते याला नाकारता येत नाही.कारण आतापासुनच नदि, तलाव, विहिरी, धरणे यांच्या पाण्याची पातळी कमी कमी होत आहे आणि ही परिस्थिती संपूर्ण महाराष्ट्रातच नाही तर देशासह संपूर्ण जगात आपल्याला पहायला मिळेल.आतापासुनच महाराष्ट्रात तापमानाचा पारा सिमापार करून पुढील काही दिवसांत कठीण परिस्थितीत निर्माण करण्याची भीती वर्तवली जात आहे.कारण मानवाने केलेला निसर्गाचा ह्यास यामुळेच आज आपल्याला उन्हाचे चटके व पाणी टंचाईचा सामना करावा लागतो आहे. त्याचप्रमाणे मानवाने केलेल्या पापाचे प्रायश्चित्त मानव तर भोगतच आहे सोबतच पशुपक्षी, संपूर्ण जीवसृष्टी, पृथ्वी, आकाश-पाताळ,नदि-नाले,तलाव, धरणे, विहिरी यांनाही भोगावे लागत आहे.कारण राज्यासह देशातील वाढते तापमान हे दिवसेंदिवस निसर्गावर सरळ प्रहार करीत असुन संपूर्ण निसर्गाचे संतुलन ढासळत आहे त्यामुळे ही गंभीर समस्या निर्माण झाली आहे.त्यामुळे नागरिकांनी वाढत्या तापमानापासुन स्वतःला सांभाळणे गरजेचे आहे.बदलत्या हवामानामुळे यावर्षी पाऊस कमी झाला. त्यामुळे आतापासूनच राज्यातील अनेक भागात आपल्याला पाणी टंचाई दिसून येत आहे.जलाशयामध्ये फक्त ३८ टक्के जलसाठा उपलब्ध असल्याचे सांगितले जाते.म्हणजे एकीकडे तापमानात वाढ यामुळे आरोग्यावर विपरीत परिणाम,तर दुसरीकडे पाणी टंचाई अशा डबल गंभीर समस्यांशी आपणा सर्वांना झुंज द्यावी लागणार आहे.वाढत्या तापमानामुळे उष्णतेची व अवकाळी पावसाचे बादल महाराष्ट्रासह अनेक राज्यात दिसून येते.राज्यात वाढते तापमान पहाता आरोग्य विभागाने उष्माघातापासून बचाव करण्याचे आवाहन सुध्दा केले आहे.वाढत्या उष्णतामानामुळे उन्हात फिरल्याने डोके दुखी,ताप येणे, जास्त घाम येणे, चक्कर येणे, बेशुद्ध पडने अशा पध्दतीची साधारणतः उष्माघाताची लक्षणे जानवु शकतात.यावर प्रार्थमिक उपाय म्हणून स्वतःची काळजी घेणे गरजेचे आहे.सावलीचा सहारा घेणे, थंड पेय घेणे,नारळाचे पाणी पिने, पाणी भरपूर पिने साधारणतः बाहेर निघताना कॉटनचे सैल कपडे घालावेत आणि जास्तच अस्वस्थ वाटत असेल डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.परंतु आज वाढत्या तापमानामुळे पशुपक्ष्यांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे त्यामुळे त्यांच्यासाठी आपापल्या पद्धतीने पाण्याची व्यवस्था केली पाहिजे व पशुपक्षांना वाढत्या तापमानापासुन दिलासा दिला पाहिजे.बदलते हवामान, पाणी साठा कमी होने,अती उष्णता, अवकाळी पाऊस याला रोखण्यासाठी राज्यासह देशात मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व्हायला हवे.यामुळे वातावरणात आमुलाग्र बदल झाल्याचे दिसून येईल व निसर्ग प्रफुल्लित राहील.

**********

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर)**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# फ्रामजी कावसजी बानाजी.

१८मे १८३८ साली भारतातून पहिली आंब्याची करंडी इंग्लंडच्या राणीला पाठविण्यात आली होती.रत्नागिरी हापूसच्या जागतिक प्रसिद्धीचा रंजक इतिहास आज पाहू या.माझ्या टाटा पॉवर कंपनी च्या पारशी मित्राने सोशल मिडियावर हा लेख पाठविला. गर्व से कहो हम हिंदू है. बोलणाऱ्यासाठी त्याने पारशी समाजातील लोकांच्या कामाची खूप मोठी यादी दिली आहे.त्यातील ही एक आंब्याची ऐतिहासिक संदर्भ असल्यामुळे वाचनीय आहे तो वाचकांना देत आहे.हा आंब्याचा सिझन चालू आहे:कोकणचा आंबा जगावर राज्य करतो याला एकमेव कारण म्हणजे फ्रामजी कावसजी बाबा ! आज मुंबईमध्ये राहणाऱ्या आयटी पब्लिकची राजधानी कुठली विचारली तर पवई हिरानंदानी गार्डन हे उत्तर मिळेल.अतिशय पॉश एरिया.भल्या मोठ्या काचेच्या इमारती,मोठमोठ्या सॉफ्टवेअर कंपन्यांचं मुख्यालय.जवळच असलेल्या आयआयटी मुळे पवईची नॉलेज सिटी ही ओळख आणखी पक्की झाली आहे.पण काही वर्षांपूर्वी इथे निसर्गरम्य जंगल होतं हे कोणाला सांगून तरी पटेल काय?.गोष्ट आहे १७९९ची.ब्रिटीश तेव्हा मुंबईत स्थिरावले होते. त्यांनी रस्ते बांधले,बाजारपेठ उभी केली. कुलाबा ते परळ हा भाग शहर म्हणून ओळखला जाऊ लागला.मात्र परळच्या पुढे सायन पर्यन्तचा भाग मागासलेला होता. जंगलवजा खेडी होती. हा भाग विकसित करण्यासाठी ब्रिटिशांनी एक पद्धत शोधुन काढली होती.गावे आणि आसपासची जंगले लीजवर द्यायची.

पवई आणि त्याच्याजवळचा भाग स्कॉट नावाच्या ब्रिटीश डॉक्टरला भाड्याने दिला होता.भाडं होत ३२०० रुपये.डॉक्टर एकदम साधेसुधे होते. खूप महत्वाकांक्षी नव्हते. पवईच्या जंगलातून मिळेल तेवढ उत्पन्न काढायचं एवढच त्यांचं ध्येय.आजारी पडल्यावर ते इंग्लंडला गेले. त्यांच्यानंतर या प्रॉपर्टीची काळजी घेण्यासाठी कोणीही नव्हते. कोणीही या जागेवर दावा केला नाही.अनेक वर्ष ही जागा पडीक राहिली. अखेर १८२९ मध्ये पवईचे नशीब फिरले. फ्रामजी कावसजी बानजी नावाच्या पारसी म्हाताऱ्याने सरकारकडे अर्ज केला की पवई आणि परिसर लीजवर मिळावा.तेव्हाचा मुंबईचा कलेक्टर जॉर्ज गिल्बर हा खूप धूर्त होता.त्याने सरकारला पवई भाडेतत्त्वावर देण्याची गरज नसल्याचं दाखवत फ्रामजी कडून लीजची रक्कम वाढवून घेतली,काही अटी घातल्या.त्या अटी देखील खूप गंमतीशीर होत्या. दहा वर्षाच्या अवधी साठी पवई भाड्याने मिळणार या काळात तिथे विहिरी,तलाव,पिण्याचे पाणी याची सोय करायची. तिथे दारू बनवली तर लोकल लोकांनाच विकायची.जंगल साफ करून शेती योग्य बनवायचे.फ्रामजी कावसजी या सगळ्या अटीसाठी एका पायावर तयार झाले आणि लवकरच ते पवईचे मालक बनले.त्यांनी खतं वापरून जमीन कसायला सुरवात केली. दरवर्षी एक याप्रमाणे १० विहिरी बांधल्या.गावात धर्मशाळा उभारली,तलाव दुरुस्त केले. थोड्याच दिवसात त्याने इंग्रज सरकारकडून आणखी आसपास ची गावे मागून घेतली.आज लोक मुंबईत स्क्वेअरफुट स्क्वेअर सेंटीमीटरवर घर घेतात अशा काळात फ्रामजी पवई ते साकीनाका चांदिवली विक्रोळी अशा महाप्रचंड भागाचा एकुलता एक मालक होता.

ब्रिटीश खूप हुशार होते. त्यांनी फ्रामजीला ज्या अटी घातल्या होत्या त्यामुळे त्यांना जमिनीचा पैसा तर मिळतच होता शिवाय गावाचा विकास होऊन तिथल्या जनतेचा आशीर्वाद देखील मिळत होता.फ्रामजी सुद्धा धूर्त होता.त्याला माहित होते जर जास्त मेहनत केली नाही तर पवईची मालकी आपल्याला परवडणार नाही. त्याने एक हुशारी केली.पवईच्या साडेतीन हजार एकर परिसरात आंब्याची एक लाख कलमी रोपे लावली.अवघ्या तीन वर्षात ही रोपे बहरून आली.त्याला आंबे लगडू लागले.बॉम्बे मँगो या नावाने ते ब्रिटीश अधिकाऱ्यांच्यात फेमस देखील झाले. फ्रामजी कावसजीने तुफान पैसा छापला.इंग्रज पवईच्या आंब्यासाठी वेडे झाले होते. त्याच्या आंब्याची चर्चा इंग्लंड पर्यंत पोचली होती.फ्रामजी कडे व्यापारी डोके सुद्धा होतं.आपले आंबे देशातून बाहेर गेले तर जास्त पैसे कमवता येईल याची खुणगाठ त्याने बांधली होती,पण असे आंबे परदेशात विकणे सोपे नव्हते,आपण पारतंत्र्यात होतो. कोणतीही गोष्ट करायची झाली तर १०० नियम पार करावे लागायचे.फ्रामजीने एक आयडिया केली.त्याने एक दिवस ते आंबे एका करंडी मध्ये व्यवस्थित पॅक केले,त्याला एक चिठ्ठी अडकवली आणि इंग्लंडला जाणाऱ्या जहाजाला ते ती करंडी नेऊन ठेवली. ते आंबे सगळ्या जगावर राज्य करणाऱ्या व्हिक्टोरिया राणी करता होते. १८ मे १८३८ साली भारतातून पहिली आंब्याची करंडी निर्यात झाली. इंग्लंडच्या राणीला देखील हे आंबे आवडले,अस म्हणतात की व्हिक्टोरिया राणीच्या एका भारतीय सल्लागारामुळे तिला आंब्याबद्दलची उत्सुकता लागली होती. त्यानंतर मात्र ती या फळाची शौकीन बनली.व्हिक्टोरिया राणीमुळे भारतीय आंब्याला परदेशी मार्केट खुले झाले.आजही कोकणचे हापूस आंबे जगावर राज्य करतात याला एकमेव कारण म्हणजे फ्रामजी कावसजी बाबा!

फ्रामजी कावसजी फक्त आंब्यावर थांबला नाही.त्याने पवईमध्ये मलबेरीची झाडे लावली,तिथे रेशीम उत्पादन सुरु केले,ऊस लावला,त्या उसापासून साखर निर्मिती साठी छोटा कारखाना देखील सुरु केला. उसाच्या मळीपासून दारू देखील गाळली जाऊ लागली.आज जिथे सिमेंटची जंगले आहेत त्या पवईमध्ये फ्रामजीने उसापासून ते सफरचंदापर्यंत अनेक गोष्टींचं उत्पादन घेतलंय. पुढे वय वाढेल तसा फ्रामजीला विरक्ती वृत्ती आली. त्याच लक्ष पैसा कमवण्यापेक्षा मुंबईतील लोकांचं जगणे कसे सुसह्य होईल याची तो काळजी घेत होता.त्यानेच मुंबईमध्ये पहिली पाईपलाईन टाकली. फ्रामजीने गिरगांवातील मुगभाटमध्ये एका मैदानात तीन मोठ्या विहिरी बनवल्या,त्यातून पाणी खेचण्यासाठी वाफेच्या इंजिनाचा पंप लावला.शिवाय बैलानी ओढण्यासाठी चारचाकी गाडीही कामाला लावली.गिरगांवला पिण्याचे स्वच्छ पाणी मिळू लागले. तो पर्यंत मुंबईकरांना पाईपलाईन हा शब्दही माहित नव्हता.

इंग्रजांना जे जमलं नव्हतं ते फ्रामजीने केलं.त्याला तब्बल ३०००० रुपये खर्च आला. आजच्या काळात त्याची किंमत काढली तर अब्जावधी रुपये होतील.पण फ्रामजीने मागेपुढे पाहिलं नाही. त्यानेच मुंबईमध्ये गॅस बत्तीची सोय केली.आज मुंबई भारतातील सर्वात अत्याधुनिक शहर आहे, लोक याच श्रेय इंग्रजांना देतात मात्र त्यांच्या बरोबरच काही भारतीय देखील होते ज्यांचा दूरदृष्टीपणा मुंबईला मोठ करून गेला यातील प्रमुख नाव म्हणजे 'फ्रामजी कावसजी बानाजी' त्याच्या या कार्याच्या स्मरणार्थ मुंबईमध्ये धोबीतलावाला फ्रामजी कावसजी यांचं नाव देण्यात आले आहे.

**************

**//राम कृष्ण हरी//**

**संकलन :-**

**सागर रामभाऊ तायडे.**

**९९२०४०३८५९,**

# शालेय विद्यार्थ्यांना अंडी, ना केळी; मुलांच्या पोषण आहारावर कोणाचा डल्ला?

## किनवट तालुक्यातील गंभीर प्रकाराकडे गटशिक्षण अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) इयत्ता पहिली ते आठवी या वर्गात शिकणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांचे कुपोषणाचे प्रमाण कमी व्हावे यासाठी शाळा मध्ये मुलांना पोषण आहार दिला जातो. मात्र किनवट तालुक्यात या शाळकरी मुलांच्या पोषण आहारावर कोण डल्ला मारत आहे हे कळायला मार्ग नसून विद्यार्थ्यांना या सकस पोषण आहारापासून वंचित ठेवत असल्याचा गंभीर प्रकार किनवट तालुक्यातील अनेक शाळेत चालू आहे. प्राथमिक शाळेतील इयत्ता पहिली आठवीच्या विद्यार्थ्यांना प्रधानमंत्री पोषणशक्ती योजनेतून आठवड्यातून एक दिवस बुधवारी किंवा शुक्रवारी अंडी किंवा केली आहार म्हणन घेता एका अंड्यासाठी ५ रुपये दर निश्चित




करण्यात आला होते पण नंतर त्याचे वाढीव काढण्यात आलेले आहे. परिपत्रक असे असताना याच पौषण आहारावर आता शिक्षक किंवा इतर डल्ला मारत असल्याचा प्रकार किनवट तालुक्यातील अनेक प्राथमिक शाळेत उघड होत आहे. शिक्षक मुलांना पोशन आहार देतात मात्र अंडी व केळी देत नाही. असे ने अनेक शाळेतील विद्यार्थ्यासह शाळा व्यवस्थापन न समितीचे अध्यक्ष सांगत आहेत. पालक व सुज्ञ न नागरिकाकडून याविषयी चौकशीची मागणी होत तू आहे. विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या शालेय पोषण आहारात आठवड्यातून एकदा अंडी आणि केळीचा न समावेश करण्याचा निर्णय राज्याच्या शालेय शिक्षण न विभागाने घेतला आहे. शालेय शिक्षण विभागाने . पोषण आहार योजनेतून राज्यातील शासकीय व – शासकीय अनुदानित शाळांमधील इयत्ता पहिली ते न आठवीच्या विद्यार्थ्यांना सकस व पौष्टिक आहार देण्याचा निर्णय घेतला आहे. राज्य सरकारच्या शासन निर्णयानुसार अनुदानीत शाळेत मुलाना अंडी देणे बंधनकारक आहे. शासन त्या शाळेला ५ रूपये दराने पैसे सुध्दा देत आहे. जर शाळेत विद्यार्थ्यांना अंडी दिली जात नसेल तर याची चौकशी करुण संबंधितावर वरिष्ठाकडून कारवाई . करण्याची मागणी पालकासह सुज्ञ नागरिकाकडून होत आहे.

# शर्मिला ठाकरे मातेसमान



पुणे : पुणे लोकसभा मतदारसंघातून वंचित बहुजन आघाडीने वसंत मोरे यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवले आहे. मनसेला सोडचिठ्ठी दिल्यानंतर राज ठाकरेंसोबत त्यांचं पुन्हा जमेल की नाही अशी चर्चा होती. दरम्यान वसंत मोरे यांनी आजही आपली निष्ठा राज ठाकरेंसोबत असल्याचे दाखवून दिले आहे. शर्मिला ठाकरे या मला मातोश्रीसमान आहेत. त्यामुळे पुण्यात निवडून आल्यानंतर त्यांचे आशीर्वाद घेण्यासाठी नक्की जाणार असे त्यांनी पत्रकारांशी बोलताना म्हटले आहे.

## तब्बल पाच वर्षे झाले, राष्ट्रीय महामार्ग काही पूर्ण होईना, किनवटचे उदाहरण राज्यातील नव्हे, देशातील एकमेव ठरेल,

किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) जाणाऱ्या व किनवटच्या वैभवात भर घालणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्र १६१ ए चे किनवट शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते जिजामाता चौक, अशोक स्तंभ दरम्यान काम थांबूनच आहे, तर आयेप्पा स्वामी मंदिर ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक हे काम झाले, पण कुठे शंभर फूट रुंद, तर कुठे त्यापेक्षा कमी रुंद काम करून महामार्ग विभाग मोकळा झाला आहे.



काम पूर्ण होणार तरी केव्हा असा सवाल उपस्थित केला जात आहे. नांदेड भोकर हिमायतनगर किनवट माहूर धनोडा या राष्ट्रीय महामार्गाचे काम हाती घेऊन साडेपाच ते सहा वर्षांचा कालावधी लोटत आहे. पण, किनवट शहरात हे काम खूपच धिम्या गतीने होत आहे. रुंदीच्या वादात हा महामार्ग केवळ किनवट शहरात अडकला आहे. शंभर फूट रुंद असताना या महामार्गाची रुंदी १८ मीटर करण्यात आली. याचे लॉजिक कोणालाही कळले नाही. तसा सवाल तत्कालीन जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी किनवट येथे उपस्थित केला होता. पण, या प्रश्नाचे उत्तर काही सापडले नाही. आयेप्पा स्वामी मंदिर ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक या महामार्गावर मधोमध लावण्यात आलेल्या विजेचे खांब अद्यापही सुरू झालेले नाही. खांब उभे पण रात्रीला अंधारच अंधार असतो, तर किनवट ते गोकुंदा या महामार्गावर रेल्वे उड्डाणपूल मंजूर आहे, पण काम काही हाती घेण्यात आले नाही. रेल्वे गेट पडले की वाहतूक ठप्प होते. हा महामार्ग पूर्णत्वास जाणार तरी कधी असा प्रश्न धुळीने त्रासलेले नागरिक उपस्थित करीत आहेत. पुढील पावसाळा येण्यापूर्वी तरी महामार्ग पूर्ण होईल का? असा प्रश्न विचारला जात आहे.

आदिवासी भागातील महामार्गाकडे दुर्लक्ष

आदिवासी भागात राष्ट्रीय महामार्गाचे काम पाच ते साडेपाच वर्ष लागणारा हा महामार्ग राज्यातील नव्हे देशातील एकमेव असावा? असे बोलले जात आहे. जिजामाता चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक या महामार्गावर दोन्ही बाजूला वाहने उभी करून वाहतुकीची कोंडी करीत आहेत. नगरपालिका व किनवट पोलिसांनी लक्ष देण्याची आवश्यकता आहे, असे बोलले जात आहे. धुळीमुळे डोळे, घसा बसणे, श्वासोच्छास घेण्यास त्रास होणे असे आजार जडले आहेत. धुळीने त्रस्त झालेल्या जनतेची मुक्ती कधी होणार, हे कोणालाही सांगता येत नाही. रेल्वे उड्डाणपुलाचे व किनवट शहरातील रखडलेल्या महामार्गाचे तत्काळ हाती घेण्याची मागणी होत आहे.

## लातूर लोकसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार सुधाकर शृंगारे यांच्या उदगीर विधानसभा मतदार संघामध्ये नागरिकांच्या गाठीभेटी.





लातूर -- महाविजय २०२४ या अभियानांतर्गत लातूर लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार सुधाकर शृंगारे यांनी जळकोट शहरात नागरिक, व्यापारी यांच्या घरी जाऊन सदिच्छा भेट घेतली व आगामी लोकसभा निवडणुकी संदर्भात विविध विषयावर संवाद साधला तसेच शहरातील नवीन श्रीराम मंदिर व शिवपार्वती मंदिरात जाऊन मनोभावे पूजन करून दर्शन घेतले .नागरिकांच्या वतीने सत्कार स्वीकारला उपस्थित भाविक भक्तांशी संवाद साधला. शहरातील माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे यांच्या निवासस्थानी जाऊन सदिच्छा भेट घेतली व आगामी लोकसभा निवडणुकी संदर्भात महत्त्वपूर्ण विषयावर चर्चा करण्यात आली. जळकोट शहरातील मार्केट यार्ड परिसरात विविध व्यापाऱ्यांच्या गाठी भेटी घेतल्या . यावेळी लोकसभा निवडणूक प्रमुख राहुल केंद्रे ,माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे , जिल्हा परिषदेचे माजी सभापती बापूराव राठोड ,भारतीय जनता पा युवा मोर्चा चे ग्रामीण अध्यक्ष अमोल निडवदे, भाजपा तालुका अध्यक्ष राजेंद्र केंद्रे, अरविंद नागरगोजे भाजपा महिला मोर्चा ग्रामीण अध्यक्ष श्रीमती उत्तराताई कलबुर्गे, शिवसेना (शिंदे गट) उमाकांत इमडे, रिपाइंचे विनोद कांबळे ,शहराध्यक्ष भाजपा शिवानंद देशमुख ,सोमेश्वर , गोपाळ देवशेट्टे, सूर्यकांत धूळशेट्टे,अविनाश वाघमारे . व्यंकट तेलंग, रामेश्वर पाटील ,चाटे मामा, निलेश गाडेकर ,धर्मपाल देव शेट्टे,विवेकानंद देवशेट्टे,भाऊराव कांबळे, साधू लोणीकर नरेश सोनवणे प्रसाद नाईकवाडे ,मयूर पटणे यासह पदाधिकारी कार्यकर्ते नागरिक व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अनीस बज्मीच्या हॉरर चित्रपटात आयुष्मान खुरानाची एन्ट्री?

मुंबई : चित्रपट निमार्ता-दिग्दर्शक अनीस बज्मी सध्या त्याचा आगामी 'भूल भुलैया ३' या चित्रपटाच्या तयारीत व्यस्त आहेत. दरम्यान, अनीस आणखी एका हॉरर चित्रपटावर काम करत असल्याची माहिती समोर आली आहे. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अनीसच्या या हॉरर चित्रपटात अभिनेता आयुष्मान खुराना दिसणार आहे. या चित्रपटाचे नाव 'भूतियापा' असल्याचे सांगण्यात येत आहे. या प्रोजेक्टसाठी अनीस आणि आयुष्मानची बोलणी सुरू असल्याचं बोललं जात आहे.भूल भुलैया ३ व्यतिरिक्त दिग्दर्शक अनीस बज्मी नो एंट्री २ मध्ये देखील काम करत आहेत. मात्र, सध्या त्याचे संपूर्ण लक्ष भूल भुलैया ३ वर आहे, ज्यामध्ये कार्तिक आर्यन मुख्य भूमिकेत दिसणार आहे. त्यांच्याशिवाय विद्या बालन आणि तृप्ती डिमरीही महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत. भूल भुलैया च्या पहिल्या भागात अक्षय कुमार मुख्य भूमिकेत होता, मात्र भूल भुलैया २ मध्ये बज्मी यांनी कार्तिकला संधी दिली होती. त्यानंतर तो भूल भुलैया ३ मध्येही दिसणार आहे. नो एंट्री २ बद्दल बोलायचे झाले तर अभिनेता वरुण धवन, अर्जुन कपूर आणि दिलजीत दोसांझ हे या चित्रपटात मुख्य भूमिकेत दिसणार आहेत. आयुष्मान खुरानाने आपल्या एक दशकाच्या चित्रपट कारकिर्दीत विविध विषयांवरील चित्रपटात काम केले. छोट्या पडद्यावर आपल्या अभिनयाची छाप पाडल्यानंतर त्याला चित्रपटात संधी मिळाली. आयुष्मानने आतापर्यंत मनोरंजन क्षेत्रामध्ये विविध स्तरावर काम केले आहे. शिवाय तो उत्तम गायकही आहे. आयुष्मानच्या पुढील चित्रपटाची प्रेक्षक वाट पाहत आहेत. जर ही बातमी खरी ठरली आणि अनीसच्या चित्रपटात आयुष्मान दिसला तर ती त्याच्या चाहत्यांना एक भेट असेल.

# आखिर कहना क्या चाहते हो राज?

नाशिक : मनसेचा पाडवा मेळावा मंगळवारी पार पडला. यामध्ये राज ठाकरेंनी पंतप्रधान मोदींसाठी एनडीएला पाठिंबा देत असल्याचे जाहीर केले पण आता त्यांच्या या भूमिकेवर उलटसुलट चर्चा सुरू झाल्या आहेत. यावर आता सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी देखील भाष्य केले आहे. आखिर कहना क्या चाहते हो? असा सवाल राज ठाकरेंना केला आहे.अंजली दमानिया म्हणाल्या, राज ठाकरेंचे भाषण जर आपण ऐकले तर ते सैरभैर झालेले दिसले. त्यांनी अनेकदा मोदी सरकारवर टीका केली. नोटाबंदीवर बोलले, रोजगार नाही यावर बोलले. एकीकडे बोलले मोदींचं काम ठीक नव्हतं म्हणून २०१४-१९ मध्ये मी टीका केली. मला खुर्ची नको होती. त्यातच ते मध्येच एखादा टोला उद्धव ठाकरेंनाही मारत होते.यामध्ये ते फक्त आपल्या भूमिकांचे जस्टिफिकेशन देत होते. मध्येच त्यांनी मीडियावर एक टोमणा मारला. जसे राज ठाकरे एरवी बोलतात, तसे कालचे भाषण नव्हते. त्यांच्या भाषणात काही कॉमेडी असते तसेही त्यांचे नव्हते, ते गोंधळलेले वाटत होते त्यामुळे मी भाषणानंतर ट्वीटही केले होते की, आखिर कहना क्या चाहते हो? त्यांना नक्की काय म्हणायचे होते हेच लोकांना कळेना, असंही दमानिया यांनी म्हटले आहे.एवढ्या लांबून त्यांचे कार्यकर्ते काल आले होते पण त्यांचं भाषण पहिल्यांदाच अगदी छोटेसे भाषण झाले. हे भाषण ऐकून मनसेचे कार्यकर्ते देखील नाराज झाले असतील. काल त्यांनी भाजपला पाठिंबा दिला पण



आधीच ते दोन-तीन वेळा म्हणाले की, राजकारणातील व्यभिचाराला राजमान्यता देऊ नका.पण त्यानंतर लगेचच त्यांनी भाजपला बिनशर्त पाठिंबा दिला. यामुळं त्यांच्या मागे ईडीचे चक्र होतं म्हणूनच त्यांनी पाठिंबा दिला का? असा प्रश्नही मनात येतो. पण हा बिनशर्त पाठिंबा देताना कारण काहीच नव्हते. कारण तुम्हाला लोकसभेची खुर्ची नाही, राज्यसभा नाही. तुम्हाला काहीच नाही आणि तुम्ही बिनशर्त पाठिंबा दिला.

# न्यूझीलंडविरुद्धच्या टी-२० मालिकेसाठी पाकिस्तान संघ जाहीर

नवी दिल्ली : पाकिस्तानने न्यूझीलंडविरुद्ध खेळल्या जाणा-या घरच्या टी-२० मालिकेसाठी संघ जाहीर केला आहे. १७ सदस्यीय संघाची कमान बाबर आझमकडे सोपवण्यात आली आहे. शाहीन शाह आफ्रिदीला हटवून बाबर आझमला पाकिस्तानच्या टी-२० संघाचे कर्णधारपद मिळाले आहे. पाकिस्तान आणि न्यूझीलंड यांच्यातील टी-२० मालिका १८ एप्रिलपासून सुरू होणार आहे.पाकिस्तान आणि न्यूझीलंड यांच्यातील टी-२० मालिका एकूण ५ सामने खेळले जाणार आहेत. या मालिकेतील पहिले ३ सामने रावळपिंडीत खेळवले जाणार आहेत. तर शेवटचे २ सामने लाहोरमध्ये होणार आहेत. रावळपिंडी येथे होणारे पहिले ३ सामने १८, २० आणि २१ एप्रिल रोजी होणार आहेत.तर लाहोरमध्ये २५ आणि २९ एप्रिल रोजी सामने होणार आहेत. न्यूझीलंडविरुद्धच्या टी-२० मालिकेसाठी संघाची घोषणा करण्यापूर्वी संघाचे मुख्य प्रशिक्षक, फलंदाजी प्रशिक्षक आणि गोलंदाजी प्रशिक्षक यांचीही नावे जाहीर करण्यात आली होती. न्यूझीलंडविरुद्धच्या मालिकेसाठी पाकिस्तानने अझहर महमूदची मुख्य प्रशिक्षकपदी नियुक्ती केली आहे. अझहर महमूद २०१७ मध्ये चॅम्पियन्स ट्रॉफी




जिंकणा-या पाकिस्तानी संघाचा गोलंदाजी प्रशिक्षकही होता.न्यूझीलंडविरुद्ध टी -२० मालिकेसाठी पाक संघ बाबर आझम (कर्णधार), शाहीन शाह आफ्रिदी, मोहम्मद रिझवान, अबरार अहमद, आझम खान, फखर जमान, इफ्तिखार अहमद, इमाद वसीम, मोहम्मद अब्बास आफ्रिदी. मोहम्मद आमिर, मोहम्मद इरफान खान, नसीम शाह, श्याम अयुब, शादाब खान, उसामा मीर, उस्मान खान, जमान खान

# आज नागपुरात बहनजींची सभा

नागपूर :- बसपाच्या राष्ट्रीय नेत्या व भावी प्रधानमंत्री बहन कुमारी मायावती जी या आज गुरुवार ११ एप्रिल रोजी दुपारी २ वाजता महात्मा फुले व बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती समारोह निमित्त नागपुरात होणाऱ्या भव्य निवडणूक जाहीर सभेला उपस्थित राहुन मार्गदर्शन करणार आहेत. बहुजन समाज पार्टी ने २०२४ च्या सात टप्प्यात होणाऱ्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात ४८ लोकसभा उमेदवार स्वबळावर लढविण्याचा निर्णय घेतलेला आहे. बहुतेक उमेदवार निश्चितही झालेले आहेत. त्यांच्या निवडणूक प्रचारार्थ बहन मायावतीजी या महाराष्ट्रात येत असून त्यांची पहिली सभा ही उत्तर नागपुरातील बेझनबाग येथे आहे. या सभेला बसपाचे सर्व लोकसभा उमेदवार, नेते, कार्यकर्ते, पदाधिकारी व हितचिंतक मोठ्या संख्येने प्रामुख्याने उपस्थित राहतील. बसपा ने नागपूर -योगेश लांजेवार, रामटेक -संदीप मेश्राम, भंडारा-गोंदिया -संजय कुंभलकर, गडचिरोली-चिमूर -प्रा योगेश गोन्नाडे, चंद्रपूर -राजेंद्र रामटेके, बुलढाणा -गौतम मघाडे, अकोला -काशिनाथ धामोडे, अमरावती ऍड -संजय गाडगे, वर्धा -डॉ मोहन राईकवार, यवतमाळ-वाशिम -हरिसिंग राठोड, हिंगोली -गजानन डाळ, नांदेड -पांडुरंग अडगुळवार, परभणी -आलमगीर खान आदी उमेदवार १९ एप्रिल व २६ एप्रिल रोजी होणाऱ्या निवडणुकीत बसपाचे आहेत. संविधानाच्या रक्षणासाठी, बहन कुमारी मायावतीजी ह्यांना प्रधानमंत्री बनविण्यासाठी बसपाच्या हत्तीवर स्वार असणाऱ्या सर्व उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करणे जरुरी असल्याने आपण बहनजिंच्या



या सभेला यशस्वी करून आपल्या विजयाचा रथ पुढे नेण्यासाठी फुले शाहू आंबेडकरी विचारावर विश्वास असलेल्यांनी, संविधान प्रिय नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते, हितचिंतक व सर्वसामान्य मतदारांनी सुद्धा मोठ्या संख्येने सहभागी व्हावे.


प्रा.विश्वनाथ आल्टे साहेब
जिल्हाध्यक्ष बसपा,लातुर

यावेळी बहुजन समाज पार्टीचे लातूर जिल्हा प्रभारी सिद्धार्थ सूर्यवंशी जिल्हाप्रोपारी होते सोनावणे जिल्हा उपाध्यक्ष जिल्हा महासचिव ज्योतिराव लामतुरे जिल्हा सचिव शेवाळे सर जिल्हा कोषाध्यक्ष शंकर जाधव सर आदी

# जय भारत!
# लोकशाही अभिवादन

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर : मी प्रथमत: भारतीय आणि अंतिमत: भारतीय. या संदर्भ विधानानुसार सर्व राज्यातील नागरिकात जाहीर अभिवादन सुरू करण्यासाठी आणि राष्ट्रीय जय घोषनाने भारतीय अभिवादन चालू करण्याकरिता भारत देशातील सर्व समाज बांधवांची ही प्रलंबित मागणी वर्ष १९५० पासून प्रलंबित राहून आता पर्यंत अपूर्ण राहिलेली आहे याकडे सर्वांचे दुर्लक्ष झालेले दिसून येत आहे लोकशाही राज्यात असे घोष वाक्याचे अभिवादन करणे आता जरूरी समजले जात आहे कारण आपल्या भारत देशात फारच जातीयवाद वाढला आहे म्हणूनच आपल्याला मनापासून अभिवादनाची जय घोषणा द्यायची आहे. जय भारत ! जय संविधान ! जय विज्ञान ! जय किसान ! जय जवान! जय भिम !हे अभिवादन स्वीकार करण्याचे सर्वांना जाहीर आव्हान केले जात आहे. जेव्हा प्रत्येक भारतीय नागरिक आपला दर दिवस व्यवहार करताना, नेहमी सार्वजनिक व वैयक्तिक ठीकाणी व हमेशा सर्व सरकारी खाजगी व्यवहारीक लहान मोठया क्षेत्रात, दर रोज सामूहिक स्थळी, नागरिक समोर येऊन एकमेकांना भेटतील किंवा हे नागरिक एकटयात जरी भेटले तरीही एक दुस-याला स्वाभिमानी समतावादी अभिवादन करण्यास वरील प्रमाणे वंदन प्रणाम सलाम जोहार घालण्याची व करण्याची तथा जूना पूराना नमस्कार त्यागून जूनी पूरानी विषमतावादी सवय सोडून समाजवादी परिर्वतनवादी भारतीयांकडून अभिमानाने मानवतावादी अभिवादन करायला माणुसकीने सुरवात करतील तेव्हाच आपले भारतीय लोक जाती धर्म व्यवस्थाच्या गुलामीतून दैनंदिन मुक्त व स्वंतत्र होतील तरच सर्व सामान्य जनता नागरिकांना आपल्या मानसिक स्वातंत्र्य व समान न्याय हक्क अधिकार बंधूत्वाची खरी पूर्ण जाणीव माहिती ओळख होऊन स्व्त:च्या व इतर समाजाच्या सामाजिक आर्थिक मूलभूत समस्यांचे निवारण होईल. व सर्वांचा प्रगती विकास होईल. परंतु आजपर्यंत कोणीच लक्ष दिलेले नाही. संपूर्ण समाजाच्या परिस्थितीत वातावरणात निश्चित बदल जाणवणार आहे. आपल्या जाती धर्माचे अभिवादन आपल्या समाजात करण्याची परवानगी मिळते परंतु इतर जाती धर्माच्या नागरिकांना लोकशाही अभिवादन घातले तर लोकांच्या मनात भरलेला कट्टर जातीभेदभाव मिटवायला काहीच उशिर लागणार नसून सर्वांनी मदत सहकार्य प्रयत्न केल्यानेच लोकशाही राज्याची निर्मिती व स्थापना होण्याची शक्यता आहे. भारतीय संविधान की जय !भारतीय एकता जिंदाबाद !लोकशाही राज्याचा विजय असो ! सर्व हिताय ! सर्व सुखाय. जय सम्राट! आयु.रमेश कांबळे रा. परतूर जि.जालना महाराष्ट्र राज्य

# प्राचार्य डॉ. सुरेश वाघमारे यांची बार्टी (पुणे)च्या संशोधन तज्ञ परिषदेच्या मार्गदर्शकपदी निवड



लातूर :- डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे येथील संशोधन विभागामार्फत संशोधन तज्ञ परिषद गठित करण्यात आली आहे. या परिषदेच्या मार्गदर्शकपदी ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. सुरेश वाघमारे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सध्या ते बार्टीच्या अभ्यास गटावर कार्यरत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे ही संस्था महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीच्या संदर्भात संशोधन करून अभ्यासपूर्ण मांडणीद्वारा शासनास अहवालाद्वारे धोरणात्मक शिफारशी करते. अनुसूचित जातीच्या संदर्भात सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, सांस्कृतिक तसेच मानववंशशास्त्रीय पैलूवर सातत्याने संशोधन करत असते. या संशोधनाच्या प्रवासात अनेक टप्प्यावर संशोधकाची तसेच तज्ञ मार्गदर्शकाची गरज पडते. या अनुषंगाने तज्ञ व्यक्तीची संशोधन परिषद गठित करण्यात आली आहे. या परिषदेच्या मार्गदर्शकपदी म्हणून प्राचार्य डॉ. सुरेश वाघमारे याची निवड केल्याचे पत्र महासंचालक सुनील वारे यांनी देवून अभिनंदन केले आहे. त्याच्या या निवडीबद्दल डॉ. नारायण कांबळे, डॉ. प्रदीप आगलावे, ड. मंचकराव डोणे, डॉ. बाळासाहेब गोडबोले, प्राचार्य डॉ. संजय गवई, डॉ. विनोद जाधव आणि डॉ. राम किशन मांजरे यांनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

# पक्ष फोडाफोडीचे पेटंट फक्त भाजपाकडे



कोल्हापूर : भारतीय जनता पक्षाकडून काँग्रेसला टार्गेट केले जात आहे. हा एक जनतेचे मन विचलित करण्याचा प्रयत्न आहे. देशपातळीवर फोडाफोडीचे पेटंट फक्त भाजपाकडे आहे. भाजपाने पक्ष फोडण्याचा ट्रेडमार्क घेतला आहे, त्यामुळे तो दुस-या कुणाला लागू होऊ शकत नाही, अशा शब्दांत काँग्रेसचे विधान परिषदेतील गटनेते आमदार सतेज पाटील यांनी भाजपावर जोरदार निशाणा साधला. कोल्हापुरात ते पत्रकारांशी बोलत होते.मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आपल्या बदललेल्या भूमिकेचे राज्यातल्या जनतेला देखील आश्चर्य वाटत आहे. राज ठाकरे महायुतीमध्ये जाऊन दोन-चार जागा लढवतील असे वाटले होते. मात्र, निवडणूकच लढवायची नाही ही भूमिका मनसेच्या कार्यकर्त्यांना देखील मान्य झाली असेल असे वाटत नाही, असे म्हणत राज ठाकरे यांच्यामध्ये इतकं का परिवर्तन झालं हे कळायला मार्ग नाही, असा टोलाही पाटील यांनी लगावला आहे.त्याचबरोबर, राज्यात फोडाफोडीचे राजकारण झाले त्यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची वक्तव्यं संपूर्ण जनतेने ऐकली आहेत.

# रमजान ईद निमीत्त लातूर शहरातील वाहतूक मार्गात बदल..

लातूर :- ११ एप्रिल रोजी रमजान ईद साजरी होणार असल्याने दयांनद गेट बार्शी रोड लातुर येथिल ईदगाह मैदानावरती मुस्लीम बांधव मोठ्या संख्येने नमाज पठणासाठी येतात. त्यामुळे नमाजाच्या वेळी रस्त्याच्या दुतर्फा गर्दी होऊन रस्ता सर्व प्रकारच्या वाहनाना बंद होत असतो. तथापी नागरिकांच्या दैनंदीन कामकाजानिमीत्त व दळणवळणानिमीत्त त्यांना विविध ठिकाणी पोहचणे निकडीचे आसते सदरच्या अडचणी लक्षात घेता दि. ११/०४/२०२४ रोजी सदर भागातुन वाहतुक बंद करणे व वाहतुक वळविणे अपरिहार्य आहे. दि. ११/०४/२०२४ रोजी सकाळी ०७.०० ते दुपारी ११.०० वाजेपर्यंत वाहतुकीस बंद असणारे मार्ग १) ईदगाह मैदान, दयानंद गेट, छत्रपती शिवाजी महाराज चौक ते अप्पे ॲटो शोरुम बार्शी रोड तसेच त्यालगतचा स्वर्गीय विलासराव देशमुख मार्ग (रेल्वेलाईनचा पॅरलल रोड) हा सर्व वाहनांना (एस.टी.बसेस, ट्रक, टेम्पो, टॅक्सी, ट्रॅव्हल्स व मिनिडोर, कार, मोटरसायकल इत्यादी) वाहतुकीसाठी बंद करण्यात येत आहे.

दि. ११/०४/२०२४ रोजी सकाळी ०७.०० ते ११.०० वाजेपर्यंत पर्यायी मार्ग. १) शिवाजी चौकातुन पीव्हिआर चौकाकडे जाणारी एस.टी.बसेस, इतर मोठी वाहने हे तहसील कार्यालय समोरुन ओव्हर ब्रिजवरुन औसा रोडने राजीव गांधी चौक - छत्रपती चौक टी पॉईंट मार्गे जातील व छत्रपती शिवाजी महाराज चौक ते पी.व्ही.आर.चौकाकडे जाणारे मोटर सायकल, तीनचाकी व चारचाकी वाहने छ.शिवाजी महाराज चौक ते औसा रोडने आशियाना टी पॉईंट, खाडगाव रोड मार्गे पी.व्ही.आर.चौककडे जातील किंवा छ.शिवाजी महाराज चौक ते अंबाजोगाई रोडने जटाळ हॉस्पीटल - शाम नगर इंडीया नगर मार्गे पी.व्ही.आर. चौकाकडे जातील. २) बार्शी रोडने छत्रपती शिवाजी महाराज चौकात येणारी जड वाहने व एस.टी. बसेस हे पी.व्ही. आर. चौकातून वळून औसा टी पाईंट - राजीव गांधी चौक मार्गे शहरात प्रवेश करतील. तसेच मोटर सायकल, तीनचाकी व छोटी चारचाकी वाहने पी.व्ही.आर.चौकातून वळून खाडगाव टी पॉईंट-आशियाना बंगला मार्गे औसा रोडकडे येतील किंवा पीव्हिआर चौक-एमआयडीसी-एक नंबर चौकातुन इंडीया नगर रोडने जुना रेणापुर नाका मार्गे शहरात प्रवेश करतील.

तरी सर्व नागरिकांनी दि.११/०४/२०२४ रोजी सकाळी ०७.०० ते ११.०० वाजेपर्यंत वाहतुकीसाठी बंद असलेल्या मार्गावर वाहनांचा वापर टाळावा व पर्यायी मार्गाचा वापर करुन प्रशासनास सहकार्य करावे.

# काँग्रेसच्या परिवर्तन गुढीमुळे लातूरात एक तास वाहतूक जॅम

## गोलाईसह मुख्य रस्त्यावर लागल्या वाहनांच्या लांबच लांब रांगा









**वाहतूक शाखाप्रमुख गणेश कदम आता तरी काही कारवाई करणार का.?**
**पोलीस प्रशासनाचा व वाहतूक शाखेचा काँग्रेस पक्षाच्या या कार्यक्रमाकडे कानाडोळा.**

लातूर / प्रतिनिधी :- परिवर्तनाची तर गुढी उभारली मात्र लातूरकरांच्या वाहतुकीच्या कोंडीचे काय. भर रस्त्यावर कार्यक्रम घेण्याचा अट्टाहास होता कोणाचा. लोकसभेचा प्रचार की जनतेला वेठीस धरण्याचा हा उपचार.गुडी जनतेच्या विकासाची काँग्रेस पक्षाच्या अट्टाहासाची.परिवर्तनाची गुढी उभारून वाहतूक कोंडी करून अमित विलासराव देशमुख यांनी काय साध्य केले. नेमकं कोणाचे हीत आहे परिवर्तन जनतेचे की डॉ. शिवाजी काळगे यांचे उमेदवारी अर्ज भरण्याआधीच काँग्रेसची विजय गुढी लातूर शहरात काँग्रेसच्या गुढीमुळे ट्रॅफिक जॅम गोलाईसह मुख्य रस्त्यावर लागल्या वाहनांच्या लांबच लांब रांगा वाहनधारकांना सहन करावा लागला नाहक त्रास .लातूर शहरात आज गुढी पाडवा सणाच्या निमित्ताने काँग्रेसच्या वतीने शहरातील मुख्य भागात असणाऱ्या काँग्रेस भवन येथे विजयाची गुढी उभारण्यात आली. मात्र यामुळे प्रचंड मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली. वाहन धारकांना या गुढीमुळे नाहक त्रास सहन करावा लागला. गांधी चौकातून गंजगोलाईकडे जाणाऱ्या रस्त्यालगत काँग्रेस भवन असून त्याच्या समोर काँग्रेसने गुढी उभी केली. माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख, लातूर लोकसभा मतदार संघाचे उमेदवार डॉ. शिवजी काळगे यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यामूळे रस्त्यावर गर्दी निर्माण झाली. परिणामी रस्त्यावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. गांजगोलाई ते अशोक हॉटेल पर्यंत वाहतुक कोंडी निर्माण झाली. एरवी सज्ञता दाखविणाऱ्या शहर वाहतूक पोलिसांनीही याकडे डोळेझाक केल्याचे चित्र रस्त्यावर दिसून आले. शिवाय, विजयानंतर गुढी उभारतात पण अजून उमेदवारी अर्जच दाखल नाही तर विजय कसला ? गुढी उभारून उमेदवार विजयी होणार का? जनतेची सेवा करणाराच उमेदवार हवा खासदार हवा अशी चर्चाही दबक्या आवाजात चर्चिली गेली.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE